# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २५० | गुरुवार, ९ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### राज्यात पुन्हा एकदा या जिल्ह्यात यलो अलर्ट

**पुणे, ता. ८ :** राज्यात अवकाळी पावसाने विश्रांती घेतली असून उन्हाचा चटका हळूहळू वाढू लागला आहे. आज पूर्व विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता असल्याने येलो अलर्ट देण्यात आला आहे. तर उर्वरित राज्यात अंशतः ढगाळ हवामानासह कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मुंबईत सकाळी गारवा आणि दुपारी कडाक्याचं ऊन जाणवत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. सतत बदलणार तापमाना मुळे नागरिक हैराण झाले आहेत. अवकाळी पावसाने शेतकऱ्यां समोर नवे संकट आणले आहे. अनेक जिल्ह्यातील गावांमध्ये वादळी वाऱ्यासह झालेल्या दमदार पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. विशेषतः मका, द्राक्ष या पिकाला मोठा फटका बसला असून शेतात उभे असलेले पीक आडवे पडल्याने शेतकरी हतबल झाला आहे. आधीच वाढत्या खर्चामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर या अवकाळी पावसाने आणखी संकट ओढवले आहे.

# पुणे–सोलापूर महामार्गावर ट्रॉफिक जामचा कहर

## दररोजची कोंडीच नवी डोकेदुखी

## कोंडी सोडवण्यात लोणी काळभोर वाहतूक पोलिस सपशेल अपयशी

**लोणी काळभोर, ता. ८ :** पुणेसोलापूर महामार्गावर दिवसेंदिवस वाढत चाललेली वाहतूककोंडी आता भीषण स्वरूप धारण करत असून, ती नियंत्रणात आणण्यात लोणी काळभोर वाहतूक पोलिस यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरत असल्याचे वास्तव समोर आले आहे. स्मार्ट सिटीच्या घोषणा केवळ कागदावरच असल्याचे या परिस्थितीतून स्पष्ट होत असून, नागरिकांचा संताप उफाळून आला आहे.



बुधवारी (ता. ८) पहाटे महामार्गावर अचानक एक कंटेनर बंद पडल्याने परिस्थिती आणखी बिघडली. कवडी पाट टोल नाका ते थेऊरदरम्यान तब्बल ५ ते ७ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. एका बाजूची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. साधारण १० मिनिटांचा प्रवास तब्बल ४५ मिनिटांहून अधिक वेळात पूर्ण करावा लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले.

सकाळी कामावर जाण्याची आणि सायंकाळी घरी परतण्याची वेळ म्हणजे या महामार्गावर अक्षरशः वाहनांचा महापूर उसळतो. किलोमीटरच्या अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा लागतात. या कोंडीत अडकून शालेय विद्यार्थी, नोकरदार, रुग्णवाहिका आणि अत्यावश्यक सेवांनाही मोठा विलंब सहन करावा लागत आहे. मात्र, या गंभीर परिस्थितीत वाहतूक पोलिसांची भूमिका केवळ बघ्याची असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

महामार्गावरील अनियोजित पार्किंग, रस्त्यावर उभे असलेले अवजड वाहन, फेरीवाले आणि नियमांचे उघड उल्लंघन करणारे वाहनचालक यामुळे परिस्थिती अधिकच बिकट होत आहे. तरीही यावर ठोस कारवाई करण्याऐवजी वाहतूक पोलिसांकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी पोलिसांचा पूर्ण अभाव, तर काही ठिकाणी केवळ नावापुरती उपस्थिती दिसून येते.

वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी कोणतीही ठोस योजना राबवली जात नसल्याची टीका होत आहे. सिग्नल व्यवस्थापन अपुरे, डायव्हर्जनची योग्य आखणी नाही, तसेच गर्दीच्या वेळेत अतिरिक्त मनुष्यबळ तैनात करण्याकडेही दुर्लक्ष केले जात आहे. परिणामी, दररोज नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिकांनाही मार्ग काढणे कठीण जात असल्याने रुग्णांच्या जीवाशी खेळ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तरीही प्रशासन आणि वाहतूक विभागाकडून कोणतीही ठोस पावले उचलली जात नसल्याने नागरिकांचा रोष वाढत आहे.

दरम्यान, वाहतूक पोलिस नेमके काय करत आहेत? असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत असून, तातडीने कडक आणि प्रभावी उपाययोजना राबवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा, ही वाहतूककोंडी भविष्यात आणखी गंभीर रूप धारण करेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

> आम्ही गावाकडे यात्रेसाठी निघालो होतो, पण लोणी स्टेशन चौकात पोहोचताच प्रचंड वाहतूक कोंडीने अक्षरशः अडवून धरलं. काही मिनिटांचा प्रवास तासभरावर गेला. लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक यांना याचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो. ही परिस्थिती आता नवीन राहिलेली नाही. दररोजचाच अनुभव बनला आहे. प्रत्येकवेळी त्याच ठिकाणी अडकून पडावं लागतं, पण यावर कोणतीही ठोस उपाययोजना होताना दिसत नाही. प्रशासन आणि वाहतूक पोलिसांनी फक्त तात्पुरती नाही तर कायमस्वरूपी आणि प्रभावी उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.
>
> - **अनिता गायकवाड,** (कदम वाकवस्ती, ता. हवेली)



## तुमचा राजकीय प्रवास काँग्रेसमुळेच : सतेज पाटलांचा पार्थ पवारांना टोला

**बारामती, ता. ८ :** बारामतीतील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण पुन्हा तापू लागले आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या रिक्त जागेसाठी काँग्रेसने उमेदवार जाहीर करत थेट लढाईचा निर्णय घेतला आहे. यामुळे बिनविरोध निवडीची शक्यता संपुष्टात आली असून, आता ही निवडणूक चुरशीची होणार हे स्पष्ट झाले आहे.

काँग्रेस भवन, शिवाजीनगर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत आमदार सतेज उर्फ बंटी पाटील यांनी काँग्रेसची भूमिका ठामपणे मांडली. खासदार पार्थ पवार यांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केले की, काँग्रेस हा देशातील एक जुना आणि व्यापक पाया असलेला पक्ष आहे. तुमचा राजकीय प्रवास काँग्रेसमुळेच घडला, हे विसरू नका. पुढील काही दिवसांत अनेक घडामोडी होतील, असा सूचक इशारा त्यांनी दिला.

या निवडणुकीचे महत्त्व केवळ एका मतदारसंघापुरते मर्यादित नाही. बारामती ही अनेक वर्षे एका विशिष्ट नेतृत्वाखाली राहिलेली जागा आहे. गेल्या ३० ते ३५ वर्षांत या मतदारसंघाने एकाच नेतृत्वावर विश्वास ठेवला. त्यामुळे आता निर्माण झालेली राजकीय पोकळी आणि त्यावर विविध पक्षांची भूमिका, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. भाजपने उमेदवार न देण्याच्या निर्णयावरही सतेज पाटील यांनी भाष्य केले. कोणत्या पक्षाने काय करावे हे आम्ही ठरवणार नाही, पण काँग्रेस स्वतःचे निर्णय स्वतः घेते, असे सांगत त्यांनी स्वबळावर लढण्याची भूमिका अधोरेखित केली.

दरम्यान, राष्ट्रवादीकडून सुनेत्रा पवार आणि काँग्रेसकडून आकाश मोरे यांना उमेदवारी मिळाल्याने ही लढत अधिक रंगतदार झाली आहे. पक्ष माघार घेणार असल्याच्या चर्चा फेटाळून लावत, काँग्रेस पूर्ण ताकदीने मैदानात उतरणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# केडगाव बाजार समितीत रेशन धान्याचा काळाबाजार उघड; १० लाखांचा माल जप्त

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ८ : शासनाच्या वतीने गोरगरीब जनतेला रास्त भाव दुकानातून मिळणाऱ्या धान्याचा काळाबाजार करण्याचा डाव यवत पोलिसांनी आणि पुरवठा विभागाने उधळून लावला आहे. केडगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाडेतत्वावर घेतलेल्या गाळ्यात बेकायदेशीरपणे साठवून ठेवलेला सुमारे १० लाख ६९ हजार ८५६ रुपये किमतीचा गहू आणि तांदूळ जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी सुनील विश्वनाथ निंबाळकर (रा. केडगाव) यांच्या विरोधात यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी सुनील निंबाळकर याने बाजार समितीचा गाळा भाडेतत्त्वावर घेतला होता. घाऊक व्यापाऱ्याचे जिन्नस साठवणूक करण्याच्या लायसन्सची मुदत सन २०१७ -१८ मध्येच संपलेली असतानाही, या गाळ्याचा वापर सरकारी धान्याची साठवणूक करण्यासाठी केला जात होता. ७ एप्रिल रोजी पुरवठा विभागाने या ठिकाणी छापा टाकला असता, तिथे सरकारमान्य रास्त भाव दुकानातील धान्याचा मोठा साठा आढळून आला.

यावेळी ८ लाख ८५ हजार ६०० रुपये किंमतीचे ४५ ते ५० किलो वजनाचे गव्हाचे एकूण ४९२ कट्टे व २ लाख ८४ हजार २५६ रुपये किंमतीचे तांदळाचे १४४ कट्टे असा एकूण १० लाख ६९ हजार ८५६ रुपये किंमतीचा सरकारमान्य रास्त भाव दुकानातील धान्य आढळून आले. हा सर्व माल ओळखीच्या गिऱ्हाइकांना काळ्या बाजाराने चढ्या दराने विक्री करण्याच्या उद्देशाने साठवला असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

याप्रकरणी दौंड तहसील कार्यालयाचे पुरवठा निरीक्षक पंकज गोरे यांनी याप्रकरणी यवत पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे. त्यानुसार सुनील विश्वनाथ निंबाळकर यांच्या विरोधात जीवनावश्यक वस्तू कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर वागज करत आहेत.

# भिमाशंकर मंदिर नित्यदर्शनासाठी भाविकांना १ जूनपर्यंत वाट पाहावी लागणार

**भिमाशंकर, ता. ८ :** नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्या पार्श्वभूमी होणारी भाविकांची होणारी गर्दी, भाविकांची सुरक्षितता, जून महिन्यातील पावसाचे प्रमाण याबाबी विचारात घेऊन मंदिर व परिसराचे काम वेळेत पूर्ण होण्याकरिता श्री क्षेत्र भिमाशंकर मंदिर भाविकांना नित्यदर्शनाकरिता ९ एप्रिल पासून पुढे ३१ मे पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली आहे.



सन २०२७मधील नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, प्रयागराज महाकुंभ २०२५ च्या अनुभवाच्या आधारे नाशिक येथील त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या भाविकांपैकी मोठ्याप्रमाणात भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भेट देण्याची शक्यता विचारात घेण्यासोबतच वाढत्या गर्दीच्या अनुषंगाने भाविकांसाठी आवश्यक सुविधा उभारणीची कामे सुरु आहे. कुंभमेळ्यावेळी श्री क्षेत्र भिमाशंकर येथे होणाऱ्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता जुन्या सभामंडपाचे क्षेत्र कमी पडणार असल्याने नवीन भव्य सभामंडपाचे काम हाती घेण्यात आलेले असून पायरी मार्गाचे काम देखील सुरू सुरू आहे.

सद्यस्थितीत मुख्य सभामंडप पूर्ण उतरवून नवीन सभामंडप बांधकाम प्रगतीपथावर आहे. सभामंडप बांधकामासाठी लागणारे बांधकाम साहित्य, मोठ्या आकाराचे दगड व अन्य यंत्रसामग्री मंदिर परिसरात असल्याने, चालू कामांचे स्वरुप, भौगोलिक परिस्थिती व भाविकांची संख्या विचारात घेता बांधकाम सुरु असताना भाविकांच्या सुरक्षिततेचा विचार करुन मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे धोकादायक आहे. मंदिर सभामंडपाचे साधारणतः ७५ टक्के बांधकाम पूर्ण झाले असून घुमटाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच मंदिराकडे जाणा-या प्रवेशमार्गावरील पायरीमार्गाचे काम प्रगतीत असून प्रवेशमार्ग पुर्णतः बंद आहे.

श्री क्षेत्र भीमाशंकर हा अतिवृष्टीचा प्रदेश असून जून ते सप्टेंबर या कालावधीत येथे अत्यंत जास्त पावसाचे प्रमाण असते. माहे जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस सुरु होण्याची शक्यता विचारात घेता, त्यापूर्वी ही कामे जलदगतीने पूर्ण होणे गरजेचे आहे. यामुळे सद्यस्थितीत विकास कामांना गती देण्यात आलेली आहे. भाविकांनी तसेच स्थानिक नागरिकांनी मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासन यांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डुडी यांनी केले आहे.

# मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात तेजवानीने भूखंड ताब्यात घेण्यासाठी फसवणूक केली

## सरकारचा हायकोर्टात युक्तिवाद

**पुणे, ता. ०८ :** मुंढवा जमीन घोटाळ्यातील आरोपी शीतल तेजवानीच्या जामीन अर्जाला राज्य सरकारने जोरदार विरोध केला. सदर भूखंड महार वतनासाठी आरक्षित असल्याचे तेजवानीला माहीत होते. जागा ताब्यात घेण्यासाठी तिने बनावट कागदपत्रे तयार केली तसेच शासनाची फसवणूक केली, असा युक्तिवाद सरकारच्या वतीने आज हायकोर्टात करण्यात आला.



मुंढवा जमीन घोटाळाप्रकरणी पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने शीतल तेजवानीला ३ डिसेंबर रोजी अटक केली होती. त्याच प्रकरणात बावधन पोलीस ठाण्यात तिच्याविरुद्ध दुसरा एफआयआर दाखल करण्यात आला तसेच खडक पोलीस ठाण्यातही तिच्या विरोधात एफआयआर नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून आरोपपत्रही दाखल करण्यात आले आहे.

त्यामुळे जामीन देण्यात यावा अशी मागणी करत शीतल तेजवानीने ॲड. दीपाली केद्वार यांच्यामार्फत हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर मंगळवारी न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्या एकलपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी तेजवानीच्या वकिलांनी युक्तिवाद करताना खंडपीठाला सांगितले की, सरकारी अधिकाऱ्यांनी जमीन खरेदीसाठी मदत केली; मात्र या जमिनीबाबत आपल्याला माहिती नव्हती. आपल्याला या प्रकरणात टार्गेट केले जात असून एफआयआर नोंदवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, सरकारच्या वतीने हा युक्तिवाद फेटाळण्यात आला. खंडपीठाने दोन्ही बाजूकडील युक्तिवाद ऐकून घेत याचिकाकर्ते तसेच सरकारला आपले लेखी म्हणणे सादर करण्यास वेळ दिली व सुनावणी २८ एप्रिलपर्यंत तहकूब केली.

# कस्तुरी ग्रुपतर्फे दिवंगत शंकर पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ ‘रुग्णवाहिका’ अर्पण

**उरुळी कांचन, ता. ८ :** प्रार्थना करणाऱ्या ओठांपेक्षा मदत करणारे हात अधिक पवित्र असतात, हा विचार कृतीत उतरवत कस्तुरी प्रतिष्ठानने आपल्या दिवंगत सहकाऱ्याला अनोखी श्रद्धांजली वाहिली आहे. कस्तुरी ग्रुपचे सचिव स्व. शंकर पांडुरंग पाटील यांच्या स्मरणार्थ प्रतिष्ठानने ७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून एक नवीन रुग्णवाहिका लोकसेवेसाठी उपलब्ध करून दिली आहे.



कस्तुरी प्रतिष्ठानची पायाभरणी २००७ मध्ये एका रुग्णवाहिकेच्या माध्यमातूनच झाली होती. ती पहिली रुग्णवाहिका घेण्यासाठी स्व. शंकर पाटील यांचा मोलाचा वाटा होता. आपल्या या जुन्या सहकाऱ्याची आठवण चिरंतन ठेवण्यासाठी कस्तुरी ग्रुपने पुन्हा रुग्णवाहिकेचाच मार्ग निवडला. या नवीन रुग्णवाहिकेचे पूजन शंकर पाटील यांच्या आई-वडिलांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पाटील कुटुंबीय आणि कस्तुरी ग्रुपचे सर्व कार्यकर्ते भावूक झाले होते.

शंकर पाटील यांना व्यायामाची आणि आरोग्याची प्रचंड आवड होती. त्यामुळे त्यांच्या स्मृती जपण्यासाठी 'जागतिक आरोग्य दिना'पेक्षा चांगला मुहूर्त असू शकत नाही, ही भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. आपल्या एका सक्रिय कार्यकर्त्याला 'रुग्णवाहिकेच्या' रूपाने लोकांच्या सेवेत कायम जिवंत ठेवण्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे.

केवळ रुग्णवाहिकाच नाही, तर कस्तुरी ग्रुपने पाटील कुटुंबाप्रती असलेली आपली सामाजिक जबाबदारी आणि मैत्रीची भावनाही जपली. यावेळी पाटील कुटुंबाला सहकार्य म्हणून कस्तुरी ग्रुपच्या वतीने एक लाख रुपयांचा धनादेश सुपुर्द करण्यात आला. संकटाच्या काळात आपल्या सहकाऱ्याच्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून कार्यकर्त्यांनी मैत्रीचा एक नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

दरम्यान, याप्रसंगी कस्तुरी ग्रुपचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शंकर पाटील यांचे कार्य आणि त्यांची सेवावृत्ती या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून अखंड सुरू राहील, असा विश्वास यावेळी प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

## संक्षिप्त

### टँकरच्या चाकाखाली चिरडून २४ वर्षीय तरुणीचा मृत्यू

**पुणे, ता. ८ :** पुण्यातील वानवडी परिसरात सुमारे ७:३० वाजता, केदारीनगर येथील २४ वर्षीय तरुणी ग्रेसिया डॅनियल इसा हिचा भरधाव पाण्याच्या टँकरच्या धडकेत मृत्यू झाला. ती एका खाजगी संस्थेत अभियंता म्हणून कार्यरत होती आणि त्या दिवशी कामासाठी घराबाहेर पडली होती. मात्र काही क्षणांतच तिचा प्रवास कायमचा थांबला. दुचाकीवरून जात असताना वळणावर वेगात येणाऱ्या टँकरने तिच्या वाहनाला धडक दिली. ती खाली पडताच टँकरच्या चाकाखाली आल्याने तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. स्थानिकांनी तत्काळ मदत करण्याचा प्रयत्न केला, मात्र उपचारांपूर्वीच तिचा मृत्यू झाला. ४५ वर्षीय टँकर चालकाने नंतर स्वतःहून शरणागती पत्करली असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. शहरातील वाढत्या टँकर वाहतुकीचे गंभीर दुष्परिणाम दाखवणारी आहे. गेल्या ४८ तासांत अशा प्रकारची ही दुसरी घटना असल्याने नागरिकांमध्ये संताप वाढला आहे. पाणीटंचाईमुळे शहरात टँकरची संख्या वाढत चालली आहे, परंतु त्यांच्या वेगावर आणि नियमांवर पुरेसे नियंत्रण नसल्याची तक्रार सातत्याने होत आहे.

### बिग बॉसमध्ये तन्वीला मिळाले तिकीट टू फिनाले

**मुंबई, ता. ८ :** बिग बॉस मराठीचा खेळ आता अंतिम टप्प्यात येऊन पोहोचलाय, खेळाचा थरार आता इतका वाढलाय की, आता टॉप ७ स्पर्धकांमध्ये करो या मरो अशी परिस्थिती निर्माण झालीय. तिकीट टू फिनालेसाठी कोण पात्र, कोण अपात्र ठरवण्यासाठी बिग बॉसनी एक टास्क घेतलेला. त्या टास्कमध्ये राकेश बापट, तन्वी कोलते आणि अनुश्री माने तिकीट टू फिनालेचा टास्क खेळण्यासाठी पात्र ठरल्या. त्यानंतर घरात या सीझनच्या तिकीट टू फिनालेसाठीचा टास्क पार पडला. हा टास्क तसा फार सोपा नव्हता. पण, तरीसुद्धा तिनही स्पर्धकांनी हा टास्क पूर्ण केला. स्पर्धकांसमोर कोळ्याचं महाकाय जाळं उभं करण्यात आलं होतं. तर, जाळ्याच्या एका बाजूला ७ प्रश्न आणि त्याच्या दुसऱ्या बाजूला त्या ७ प्रश्नांची उत्तरं ठेवलेली, कोळ्याचं जाळं भेदून स्पर्धकांना अचूक उत्तरं शोधून ती त्या प्रश्नांसमोर लावायची होती. तिन्ही स्पर्धकांनी हा टास्क पूर्ण केला. सर्वात आधी राकेश बापटनं २१ मिनिटांच्या आसपास वेळ घेतला. त्यानंतर आलेल्या तन्वी कोलतेनं साडेसहा मिनिटांच्या आसपास वेळ घेतला. तर, नंतर आलेल्या अनुश्री मानेनं नऊ मिनिटांच्या आसपास वेळ घेतला. त्यामुळे सर्वात कमी वेळ घेऊन तन्वीनं स्वतःला सिद्ध केले आणि तिकीट टू फिनाले पटकावलं.

### खरातविरोधात आणखी ११ महिलांची तक्रार

**नाशिक, ता. ०८ :** अशोक खरात प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. अशोक खरातचे पाय आणखी खोलात गेले आहेत. त्याच्या विरोधात आणखी ११ महिलांनी लैंगिक शोषण केल्याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे खरातविरोधात महिलांच्या तक्रारींची संख्या १९ वर पोहचली आहे. पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आणखी ११ महिलांनी खरात विरोधात पोलिसांत धाव घेतली. खरातने या म हिलांना भीती दाखवली होती. पतीचा मृत्यू अटळ आहे तसंच कुटुंबियांच्या जीवाची भीती दाखवून नराधम खरातने त्यांच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. देवाची ऊर्जा देण्याच्या नावाखाली भोंदू खरात महिलांचं शोषण करत होता. अशोख खरात प्रकरणाचा नाशिक पोलिस, एसआयटी आणि आता ईडीकडून कसून तपास सुरू आहे. या प्रकरणाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

### आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका

**पुणे, ता. ०८ :** महाराष्ट्रातील प्रशासनात बदल्याच्यांचे वारे वाहत असल्याचे चित्र आहे. कारण, आठवडाभरात राज्यात ३५ पेक्षा जास्त सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. यामध्ये अनेक महत्त्वाच्या आयएएस अधिकार्यांच्या नावाचा समावेश आहे. गेल्या आठवड्यात राज्यात २५ अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या होत्या. त्यात तुकाराम मुंडे यांच्या नावाचाही समावेश होता. त्यात आता आणखी ११ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. ११ सनदी अधिकाऱ्यांची वेगवेगळ्या विभागात बदली झाली आहे. त्यामध्ये आयएएस अधिकारी श्वेता सिंघल, रंजन महिवाल, लक्ष्मण राऊत या अधिकाऱ्यांच्या नावांचा समावेश आहे.या बदल्यांमुळे महसूल, कृषी आणि स्थानिक प्रशासकीय विभागांत मोठे फेरबदल पाहायला मिळत आहेत.

### पहिल्याच बॉलला वैभवचा सिक्स

**गुजरात, ता. ०८ :** आयपीएल २०२६ मधील १३व्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने मुंबई इंडियन्सवर २७ धावांनी शानदार विजय मिळवला. गुवाहाटीतील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या या सामन्यात पावसाचा व्यत्यय आल्याने ११-११ षटकांचा खेळ झाला, ज्यामध्ये राजस्थानने बाजी मारली. सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या राजस्थानकडून १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने पुन्हा एकदा तुफानी खेळी केली. सर्वात महत्त्वाचं म्हणजे भेदक मारा करणाऱ्या जसप्रीत बुमराहला त्याने पहिल्याच चेंडूवर खणखणीत सिक्स लगावला ज्यानंतर बुमराहची रिऍक्शन बघण्यासारखी होती.सूर्यवंशी तिथेच थांबला नाही, त्याने त्याच षटकाच्या चौथ्या चेंडूवरही षटकार मारला. या ११ षटकांच्या सामन्यात सूर्यवंशीने एक चौकार आणि पाच षटकारांसह १४ चेंडूंमध्ये ३९ धावांची धडाकेबाज खेळी केली. यासह, वैभवने आता आयपीएल २०२६ मध्ये समीर रिझवीसोबत सर्वाधिक षटकारांच्या विक्रमाचीही बरोबरी केली आहे.

# लोणी काळभोर पोलिसांचा हातभट्टी विक्रीच्या अड्ड्यावर छापा

## ५१ हजारांचा मुद्देमाल जप्त तर दोघांना अटक



**लोणी काळभोर, ता. ८ :** आरोग्यास घातक असलेल्या हातभट्टी दारूची विक्री होत असलेल्या अड्ड्यावर लोणी काळभोर पोलिसांनी छापा टाकला आहे. या छाप्यात पोलिसांनी ४९० लिटर दारूसह ५१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून दोघांना बेड्या ठोकल्या आहे. लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील बाजारमळा परिसरात असलेल्या मोगले वस्तीच्या कॅनॉलजवळ मंगळवारी (ता. ७) दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास केली आहे.

शिवाजी सुभाष फंड (वय २७) आणि सागर प्रकाश काळभोर (वय २८) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंमलदार अशोक भागवत गिरी यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर काळभोर यांच्या पत्र्याच्या घरामध्ये एक इसम हातभट्टीची तयार दारू कॅन्ड भरली असून लोकांना विक्रीसाठी ठेवली आहे. अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला असता काही लोक संशयित रित्या थांबलेले दिसले. यावेळी पोलीसांची चाहुल लागताच गावठी दारु विकत घेणारे दोन इसम त्या ठिकाणावरुन पळुन गेले. तर पोलिसांनी घटनास्थळावरून शिवाजी फंड आणि सागर काळभोर या दोघांना ताब्यात घेतले.

पोलिसांनी सदर ठिकाणची पहाणी केली असता, प्लॅस्टिकच्या प्रत्येकी ३५ लिटरच्या एकूण ८३ निळ्या व काळ्या रंगाच्या कॅन्डपैकी १४ कॅन्ड दारूने भरलेली आढळून आले. तसेच त्यांनी गावठी हातभट्टीची दारु इसम नामे आलताफ अख्तर उर्फ अली रा. श्रीगोंदा आष्टी जि.अहिल्यानगर याच्याकडून विकत आणल्याचे सांगितले. पोलिसांनी या छाप्यात ४९० लिटर दारू ३०० लिटरचा प्लास्टिक बॅरल असा एकूण सुमारे ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी पंचासमक्ष नमुने जप्त करून उर्वरित दारू नष्ट केली. तपासादरम्यान ही दारू बाहेरून मागवून स्थानिक पातळीवर विक्री केली जात असल्याचेही निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करून अटक केली आहे. ही कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर, अरुण जाधव, पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के, पोलीस हवालदार अण्णा माने, महेश करे, सागर जगदाळे, पोलीस अंमलदार प्रवीण धडस, अशोक गिरी, सचिन सोनवणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

### शरद पवारांचा पार्थ पवारांना मोलाचा सल्ला

**बारामती, ता. ८ :** बाराम तीच्या पोटनिवडणुकीत विनंती करुनही काँग्रेस पक्षाने सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार रिंगणात उतरवल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात काहीशी नाराजी आहे. याच मुद्द्यावरुन अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी काँग्रेसविषयी तीव्र नाराजी व्यक्त करत काँग्रेसची म हाराष्ट्रातील डाऊनफॉलची सुरुवात झालीय असं म्हटलं. मात्र त्यांच्या या विधानावर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सल्ला देणारं विधान केलंय. त्यांनी या मुद्द्यावर बोलताना,मला असं वाटतं की राजकारणामध्ये काही महत्त्वाच्या निर्णयांवर स्टेटमेंट करायला एकप्रकारची परिपक्वता लागते. ती कितपत आहे, हे आज मी सांगू शकत नाही. असं म्हटलंय. हे वक्तव्य करुन शरद पवार यांनी पार्थ पवार यांना कोणतेही राजकीय भाष्य करताना ते जबाबदारीने आणि तर्कसंगत करावे, असा अप्रत्यक्ष संदेश दिल्याची चर्चा सध्या रंगलीय.

# अशोक खरात प्रकरणी सुषमा अंधारेंच्या प्रश्नांवर तेजस्वी सातपुतेंचा खुलासा



**मुंबई, ता. ८ :** नाशिकमधील भोंदू अशोक खरात प्रकरणात शेकडो महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचे आरोप समोर आल्यानंतर तपासाच्या कक्षेत आता राजकीय नावेही आल्याने प्रकरण अधिकच संवेदनशील बनले आहे. मोबाईल सीडीआरमधून काही नेत्यांची नावे समोर आल्यानंतर त्यांच्यावर कारवाई होणार का, त्यांना चौकशीसाठी कधी बोलावले जाणार, असा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी थेट प्रश्न उपस्थित करत, अशोक खरातशी असलेल्या रुपाली चाकणकर आणि इतर नेत्यांना एसआयटी चौकशीसाठी कधी बोलावणार, अशी विचारणा केली. केवळ नावे समोर येऊनही पुढील कारवाई का होत नाही, असा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

या प्रश्नांना उत्तर देताना एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी स्पष्ट केले की, तपास हा केवळ नावांवर आधारित न करता साक्षीदारांनी दिलेल्या माहिती आणि ठोस पुराव्यांच्या आधारेच केला जात आहे. आतापर्यंत नोंदवलेल्या गुन्ह्यांच्या चौकटीतच कारवाई सुरू असून, कोणालाही केवळ चर्चेत आले म्हणून तातडीने चौकशीला बोलावले जाणार नाही.


गेल्या १७ दिवसांपासून तपास सुरू असून पुढील काळातही तो सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे राजकीय नेत्यांवर तात्काळ एफआयआर किंवा कारवाई होण्याबाबत स्पष्ट संकेत देण्याचे त्यांनी टाळले, मात्र पुरावे समोर आल्यास कारवाईची शक्यता नाकारली नाही. सातपुते यांनी सीडीआर लीक प्रकरणावरही भाष्य करत, हा डेटा बाहेर कसा आला याची शासन स्तरावर चौकशी सुरू असल्याचे सांगितले.

दरम्यान, या प्रकरणातील गंभीरता लक्षात घेता तपास वेगाने पुढे जात आहे. आतापर्यंत अशोक खरातविरोधात ११ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ८ गुन्हे हे महिला अत्याचाराचे आहेत. ३० पेक्षा अधिक साक्षीदारांची चौकशी करण्यात आली आहे. आरोपीने स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचा दावा करत महिलांची फसवणूक आणि लैंगिक शोषण केल्याचे समोर आले आहे.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या संवेदनशील व्हिडिओंवरही मोठी कारवाई करण्यात आली असून, आतापर्यंत ४६५० व्हिडिओ लिंक हटवण्यात आल्या आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर, तपास पुढे जात असताना राजकीय कनेक्शनबाबत काय निष्पन्न होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## यवत येथे पीएमपीएमएल बस व दुचाकीचा अपघात

**राहुलकुमार अवचट**



यवत, ता. ८ : पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर अपघाताचे सत्र सुरूच आहे. सेवा रस्त्याच्या सुरवातीलाच चुकीच्या पद्धतीने वाहने उभी केली जात असल्याने आज रात्री सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास पीएमपीएमएल बस व दुचाकीचा जोरदार अपघात झाला.

पाटस वरून पीएमपीएमएल बस हडपसर दिशेने मुख्य रस्त्यावरून सेवा रस्त्यावर जात असताना सिद्धी हॉस्पिटल समोर सेवा रस्त्यावरून येणाऱ्या दुचाकीला बसने समोरील बाजूने जोरदार धडक दिली असून या अपघातात दुचाकीवर असलेले दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. परिसरातील नागरिकांनी जखमींना तात्काळ उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले असून जखमींवर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर यवत येथे दोन्ही बाजूने सेवा रस्ता केला असून सेवा रस्त्याच्या सुरुवातीला दोन्ही बाजूने असंख्य वाहने रोज उभी असल्याने समोरून येणारी वाहने दिसत नाही आणि यामुळेच अनेक वेळा अपघात घडत आहेत .

## अमली पदार्थ विक्रेत्यांवर मकोका लावणार; पुणे पोलिस आयुक्तांचा इशारा




**पुणे, ता. ८ :** पुणे शहरात वाढत चाललेल्या ड्रग्सच्या विळख्याविरोधात पोलिसांनी आता स्पष्टपणे आक्रमक भूमिका घेतली असून, कारवाईची दिशा आणि तीव्रता दोन्ही बदलल्याचे चित्र दिसत आहे. आतापर्यंत किरकोळ गुन्ह्यांपुरती मर्यादित असलेली कारवाई आता संघटित गुन्हेगारीकडे वळवण्यात आली असून, ड्रग्स रॅकेट मोडून काढण्यासाठी थेट मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिलेला शहरातून ड्रग्स पूर्णपणे हद्दपार होईपर्यंत शांत बसणार नाही हा इशारा केवळ प्रतीकात्मक नसून, प्रत्यक्ष कारवाईत त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. मकोका लागू झाल्यानंतर आरोपींना जामीन मिळवणे अत्यंत कठीण होते आणि दीर्घ काळ तुरुंगवास भोगावा लागतो. त्यामुळे ड्रग्स विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

या मोहिमेचा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे आता केवळ विक्रेतेच नव्हे, तर ड्रग्स खरेदी करणारे आणि सेवन करणारेही पोलिसांच्या रडारवर आले आहेत. मजा म्हणून ड्रग्स घेणाऱ्यांनाही कायद्याचा फटका बसणार असल्याने तरुणांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. ही भूमिका पोलिसांनी जाणीवपूर्वक घेतली आहे, कारण मागणी असेल तरच पुरवठा टिकतो, या तत्त्वावर कारवाई केली जात आहे. शहरातील काही भागांमध्ये ड्रग्सचे जाळे खोलवर पसरल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. त्यामुळे आता स्वतंत्र पथके तयार करून गुप्त माहितीच्या आधारे सापळे रचले जात आहेत. केवळ किरकोळ पेडलर्सवर कारवाई न करता, या रॅकेटमागील मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचण्यावर पोलिसांचा भर आहे.

या कारवाईचे परिणाम केवळ कायदेशीर नाहीत, तर सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचे आहेत. ड्रग्समुळे तरुण पिढीचे आरोग्य, करिअर आणि कुटुंब व्यवस्था धोक्यात येत असल्याने ही मोहीम आवश्यक ठरते. नागरिकांनीही संशयास्पद हालचालींबाबत माहिती देण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. एकूणच, पुण्यातील ड्रग्सविरोधी लढाई आता निर्णायक टप्प्यात पोहोचली असून, पुढील काळात मोठ्या कारवायांची शक्यता स्पष्ट दिसत आहे.

## मोरगावातील ज्वेलर्स दुकानावरील चोरीचा प्रयत्न रखवालदारामुळे फसला




**मोरगाव, ता. ०८ :** बारामती तालुक्यातील मोरगाव येथे सोमवारी पहाटे सुमारे अडीच वाजण्याच्या सुम ारास चोरीचा प्रयत्न झाल्याने परिसरात खळबळ उडाली. मोरगावमधील तुळजाभवानी ज्वेलर्स या दुकानावर चार ते पाच चोरट्यांनी हल्ला करत शटर तोडण्याचा प्रयत्न केला. चोरटे लाल रंगाच्या कारमधून आले होते, अशी माहिती मिळाली आहे.

चोरीचा प्रयत्न सुरू असताना गावातील रखवालदार लालबहादूर बिस्टा घटनास्थळी पोहोचले. एकटे असतानाही त्यांनी धाडसाने चोरट्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. समोर अनेक सशस्त्र चोरटे असूनही त्यांनी मागे हटण्याऐवजी त्यांच्याशी सामना केला. चोरट्यांनी त्यांना घाबरवण्यासाठी त्यांच्या अंगावर कार चालवण्याचाही प्रयत्न केला. मात्र, ते थोडक्यात बचावले.

रखवालदाराच्या या धाडसी भूमिकेमुळे चोरट्यांना पळ काढावा लागला. तरीही त्यांनी दुकानातून काही चांदीचे साहित्य घेऊन पसार झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मोठी चोरी होण्यापासून बचाव झाल्याने व्यापारी आणि ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. मोरगावमध्ये गेल्या आठवड्यातील हा तिसरा चोरीचा प्रयत्न असल्याने नागरिकांम ध्ये भीती आणि नाराजीचे वातावरण आहे. सतत घडणाऱ्या घटनांमुळे पोलिसांच्या गस्तीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या घटनेनंतर सुरक्षेच्या उपाययोजना वाढवण्याची मागणी होत आहे.

लालबहादूर बिस्टा यांनी गेल्या २५ वर्षांपासून गावात रखवालीचे काम करताना अनेक वेळा तत्परता दाखवली आहे. या घटनेतही त्यांनी दाखवलेल्या धैर्यामुळे मोठी चोरी टळली. त्यांच्या या कामगिरीचे संपूर्ण गावातून कौतुक होत आहे. या प्रकरणी सुपा पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

## भोंदूबाबाला ४ वर्षांची सक्तमजुरी; बारामती न्यायालयाचा मोठा निर्णय



**बारामती, ता. ८ :** बारामती परिसरात भोंदूबाबाच्या नावाखाली फसवणूक आणि अत्याचाराचा गंभीर प्रकार समोर आला आहे. मिलिंद म दन जाधव (वय ५०, रा. गुहागर, जि. रत्नागिरी) या व्यक्तीने पैशांचा पाऊस पाडून श्रीमंत करून देतो असे आमिष दाखवून अनेक महिलांची फसवणूक केली होती. या प्रकरणी बारामती न्यायालयाने त्याला दोषी ठरवत कठोर शिक्षा सुनावली आहे.

जिल्हा न्यायाधीश एस. आर. पाटील यांनी दिलेल्या निकालानुसार, आरोपीला जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत ४ वर्षे सक्तमजुरी आणि दहा हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. तसेच फसवणुकीच्या गुन्ह्यात २ वर्षांची शिक्षा आणि पाच हजार रुपये दंड सुनावण्यात आला आहे.

मिलिंद जाधव याने बारामती भागातील महिलांना ’मला पैशांचा पाऊस पाडता येतो’ असे सांगून एका अघोरी पूजेचे आयोजन केले होते. या पूजेच्या नावाखाली महिलांना चुकीच्या पद्धतीने बसवून त्यांच्यावर शारीरिक अत्याचार करण्यात आला. तसेच पूजा करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या नावाखाली त्यांच्याकडून मोठी रक्कम उकळली गेली. या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या महिलांनी बारामती तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक धनश्री भगत यांनी केला आणि न्यायालयात पुरावे सादर केले.

सरकारी वकील ॲड. ज्ञानदेव शिंगाडे यांनी न्यायालयात सात साक्षीदार तपासले. सर्व पुरावे आणि दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून न्यायालयाने मिलिंद जाधव याला दोषी ठरवले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती. आता न्यायालयाच्या निकालामुळे या प्रकरणाला शेवट मि ळाला असून पोलीस पुढील कारवाई करत आहेत.

## लोणीकंद येथे जुन्या वादातून तरुणाला ‘विकेट’ टाकण्याची धमकी; दोन तरुणांविरुद्ध गुन्हा




**लोणीकंद, ता. ८ :** गावच्या यात्रेत झालेल्या किरकोळ वादाच्या रागातून दोघांनी एकाला बेदम मारहाण करून ‘विकेट’ टाकण्याची धमकी दिल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. लोणीकंद येथील ‘दुनियादारी हॉटेल’समोर रविवारी (ता. ०६) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली. याप्रकरणी दोघांवर लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन नारायण राखपसरे (वय -३२, रा. सहकार नगर, लोणीकंद) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे, तर अनिकेत खंडागळे (वय-२३, रा. लोणीकंद), व आदी दोरके (वय -२४, रा. वाघोली), अशी मारहाण करणाऱ्या दोघांची नावे आहेत. याप्रकरणी राखपसरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सचिन राखपसरे हे पारले कंपनीत माथाडी कामगार म्हणून कार्यरत आहेत. रविवारी रात्री साडे अकरा वाजण्याच्या सुमारास सचिन हे दुनियादारी हॉटेलजवळ थांबले होते. यावेळी त्यांच्या ओळखीचे दोन तरुण दुचाकीवरून तिथे आले. एप्रिल २०२५ मध्ये लोणीकंद गावच्या यात्रेत सचिन राखपसरे आणि अनिकेत खंडागळे यांच्यात शाब्दिक वाद झाला होता. त्याच वादाचा राग मनात धरून आरोपींनी सचिन यांच्यावर हल्ला चढवला.

आरोपींनी काहीही न बोलता सचिन यांची कॉलर पकडून शिवीगाळ सुरू केली. यावेळी अनिकेत खंडागळे याने सचिन यांचे दोन्ही हात पाठीमागून घट्ट धरून ठेवले, जेणेकरून त्यांना हालचाल करता येऊ नये. त्याच वेळी त्याचा साथीदार आदी दोरके याने आपल्याकडील एका कठीण वस्तूने (संशयित लोखंडी रॉड किंवा तत्सम वस्तू) सचिन यांच्या तोंडावर उजव्या बाजूला जोरात प्रहार केला. या हल्ल्यात सचिन गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडले.

मारहाण केल्यानंतर आरोपींनी सचिन यांना आता तुला एवढ्यावरच सोडतो, तु सुधरून राहा नाहीतर तुझी विकेट टाकीन अशी धमकी देऊन दुचाकीवरून पळ काढला. या झटापटीत फिर्यादीचा मोबाईलही गहाळ झाला आहे. जखमी सचिन यांनी तातडीने पोलीस स्टेशन गाठले, तिथून त्यांना उपचारासाठी ससून रुग्णालयात पाठवण्यात आले. उपचार पूर्ण झाल्यानंतर त्यांनी रीतसर तक्रार दाखल केली.

दरम्यान, लोणीकंद पोलिसांनी या दोन्ही आरोपींविरुद्ध मारहाण, शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी कायदेशीर गुन्हा दाखल केला आहे.

# बाळराजे आवारेंवर ११ गुन्हे; आता थेट मोक्का लागणार?

**सोलापूर, ता. ८ :** सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात अंजनगाव खेलोबा येथे रात्रीतून परवानगीशिवाय महापुरुषाचा पुतळा बसवण्यात आल्याने मोठा वाद निर्माण झाला असून, या प्रकरणाने राज्यातील वाढत्या पुतळा राजकारणावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. गेल्या काही दिवसांत अशा घटनांची मालिका सुरू असून, स्थानिक पातळीवर सामाजिक तणाव वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.




अंजनगावमधील घटनेनंतर दोन समाजांमध्ये तीव्र वाद निर्माण झाला. परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी कठोर कारवाई करत दोन्ही गटांतील शेकडो लोकांवर गंभीर गुन्हे दाखल केले. यामध्ये दंगल भडकवणे, जीवघेणा हल्ला, शासकीय कामात अडथळा आणि सरकारी मालमत्तेचे नुकसान यांसारखे आरोप आहेत. त्यामुळे हा केवळ स्थानिक वाद न राहता कायदा-सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न बनला आहे. या प्रकरणात जालना येथील बाळराजे आवारे याचे नाव समोर आले असून, त्याच्यावर विविध ठिकाणी अशा प्रकारच्या घटनांशी संबंधित गुन्हे दाखल असल्याची माहिती पुढे आली आहे.

अंजनगावसह करमाळा तालुक्यातील पुतळा प्रकरणातही त्याचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. यामुळे काही ठिकाणी संघटित पद्धतीने पुतळे बसवून तणाव निर्माण केला जातोय का, याचीही चौकशी सुरू आहे.

घटनेनंतर प्रशासनाने घेतलेल्या भूमिकेला विशेष महत्त्व आहे. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट इशारा देत परवानगीशिवाय पुतळे बसवण्याच्या प्रकारांना मुळीच सहन केले जाणार नाही, असे सांगितले. या प्रकारामुळे ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचा सन्मान राखण्याऐवजी त्यांचा वापर वाद निर्माण करण्यासाठी होत असल्याची टीकाही व्यक्त होत आहे.

# बारामतीत चॉकलेटचे आमिष दाखवून दहा वर्षांच्या बालिकेवर अत्याचार

## नराधमाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**बारामती, ता. ८ :** शेजारी राहणाऱ्या नराधमाने चॉकलेटचे आमिष दाखवून १० वर्षांच्या बालिकेवर अत्याचार केल्याची घटना नुकतीच बारामती शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणी बारामती पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे.

हसन शमशुद्दीन झारे ऊर्फ राजू (वय ५२, रा. बारामती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी हा सराईत गुन्हेगार असून यापूर्वी एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी त्याने १० वर्षांची सक्तमजुरी भोगली आहे. कारागृहातून बाहेर आल्यानंतरही त्याने पुन्हा अशाच प्रकारचा घृणास्पद गुन्हा केल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा फिर्यादीच्या शेजारीच राहत होता. त्याने परिचयाचा फायदा घेत बालिकेला चॉकलेटचे आमिष दाखवून स्वतःच्या घरात नेले. तिथे तिच्याशी अश्लील कृत्य करून हे कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. तपासादरम्यान आरोपीने आणखी एका मुलीसोबतही अश्लील वर्तन केल्याचे समोर आले आहे.



हसन झारे हा सराईत विकृत गुन्हेगार आहे. त्याने २००९ मध्ये एका १३ वर्षांच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार केला होता. त्या गुन्ह्यात न्यायालयाने त्याला १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली होती. शिक्षा भोगून आल्यानंतरही त्याच्या मनोवृत्तीत कोणताही बदल झाला नसल्याचे या नव्या घटनेवरून स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, रविवारी (ता. ०५) या घटनेची तक्रार देण्यासाठी फिर्यादी पोलीस स्टेशनला येताच आरोपीला याची कुणकुण लागली आणि तो घरातून पसार झाला. पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तातडीने हालचाली केल्या. तांत्रिक पुरावे आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संपूर्ण शहरात शोधमोहीम राबवली. अखेर, शहर सोडून पळून जाण्याच्या बेतात असताना बारामती एस.टी. स्टँड परिसरात पोलिसांनी त्याला वेढा घालून ताब्यात घेतले.

या कारवाईत पोलीस हवालदार सुलतान डांगे, अमोल देवकाते, ऋषिकेश जाधव, राहुल बडे आणि गौरव ठोंबरे यांनी विशेष परिश्रम घेतले. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, त्याची रवानगी येरवडा केंद्रीय कारागृहात (जेल कस्टडी) करण्यात आली आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संध्याराणी देशमुख या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# पुण्यात मद्यधुंद कारचालकाची ४-५ वाहनांना धडक; वाहतूक पोलिसाच्या अपहरणाचा प्रयत्न

**पुणे, ता. ८ :** वारजे परिसरात मंगळवारी दुपारी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. मद्यधुंद अवस्थेतकारचालवणाऱ्याचालकाने भरधाव वेगात ४ ते ५ वाहनांना धडक दिलीच, शिवाय कारवाईसाठी गेलेल्या वाहतूक पोलिसाच्या अपहरणाचा प्रयत्न केल्याने परिसरात खळबळ उडाली. या प्रकरणी संजोग सुरेश माने (वय -३०) याला वारजे पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्राथमिक तपासात संबंधित चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचे स्पष्ट झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, उत्तमनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्र क्षीरसागर हे न्यायालयीन कामकाजासाठी शिवाजीनगरकडे जात असताना शिवणे ते वारजे माळवाडी दरम्यान एक कार भरधाव वेगात जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या कारने मार्गात काही वाहनांना धडक देत पुढे पळ काढल्याची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ पाठलाग सुरू केला.

वारजे चौकाजवळ संबंधित कारने एका टेम्पोला धडक दिली. त्यानंतर क्षीरसागर यांनी धाडसाने कार ओव्हरटेक करून थांबवली. त्यांनी जवळील वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांना बोलावून चालकाला पोलीस चौकीत घेऊन जाण्याच्या सूचना दिल्या. मात्र, वाहतूक पोलिस कर्मचारी कारमध्ये बसताच चालकाने अचानक वेग वाढवत कार पुढे दामटली. त्यामुळे काही काळ त्या कर्मचाऱ्याच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला. हा प्रकार अपहरणाच्या प्रयत्नासारखा असल्याचे समजते.

यानंतर पुन्हा पाठलाग करत क्षीरसागर यांनी कार अडवून चालकाला पकडले. त्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले. या घटनेनंतर वारजे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. रात्री उशिरापर्यंत वारजे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# अमेरिका-इराण यांच्यातील युद्ध थांबलं; होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणार

**मुंबई, ता. ८ :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत युद्धविरामाची घोषणा केली. ४० दिवसांच्या संघर्षानंतर दोन्ही देश युद्धविरामासाठी सहमत झाले. त्यामुळे आता जगावर येणारे संकट टळले असल्याचे दिसून येत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आज भारतीय वेळेनुसार आज सकाळी पाच वाजल्यानंतर इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ले करण्याचा आणि इराणला उद्ध्वस्त करण्याचा इशारा दिला होता. मात्र दिलेल्या अल्टिमेटम पूर्वीच इराण आणि अमेरिकेमध्ये दोन आठवड्यांची सशर्त शस्त्रसंधी करण्यात येत अल्याची घोषणा डोनाल्ड ट्रम्प यांनी केली.



इराणचा दोन आठवडे शस्त्रसंधीचा प्रस्ताव स्वीकारल्याचं ट्रम्प यांनी म्हटलंय. तर हल्ले थांबल्यास आम्हीही युद्ध थांबवू असं इराणचे परराष्ट्र मंत्र्यांनी म्हटलं आहे. इराणनं दिलेला १० अटींचा मसुदा मान्य करण्यासारखा असल्याचं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं. तर होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याची अट अमेरिकेने घातली होती ही या अटीला इराणनेदेखील सकारात्मक प्रतिसाद दिला. इराण होर्मुझ पूर्णपणे आणि लगेच खुलं करायला तयार झाल्याचंही ट्रम्प यांनी सांगितलं आहे. दरम्यान, अमेरिकेने इराणसोबत दोन आठवड्यांच्या युद्धविरामास सहमती दर्शवली आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी सोशल मीडियावर म्हटले आहे की, दोन आठवड्यांच्या कालावधीसाठी, तांत्रिक समन्वयाने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्गक्रमण शक्य होईल. मात्र, त्यांच्या विधानात सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांकडून आकारल्या जाणाऱ्या टोलच्या मुद्द्यावर भाष्य केलेले नाही. या विधानावरून असे सूचित होते की, इराण सध्या तणाव कमी करण्याच्या मनस्थितीत आहे, परंतु पूर्णपणे माघार घेण्यास तयार नाही. दरम्यान, इराणवर मोठा हल्ला करण्याची आणि तेथील संपूर्ण संस्कृती नष्ट करण्याची धमकी दिल्यानंतर काही तासांतच डोनाल्ड ट्रम्प यांनी हे विधान केले. या युद्धविरामात पाकिस्ताननेही महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याचा उल्लेख ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टमध्ये केला. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनीही पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि फील्ड मार्शल मुनीर यांचे आभार मानले.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## आरोग्याच्या दृष्टीने रोज कच्चा लसूण का खायला हवा, जाणून घ्या

आपल्याकडे आहारात लसूण हा हमखास वापरला जातो. लसूण हा आपल्या आरोग्यासाठी फार महत्त्वाचा मानला जातो. तुमच्या आहारात लसणाचा अनेक प्रकारे समावेश करू शकता. अर्ध्या पाकळीने सुरुवात करा आणि हळूहळू अख्ख्या पाकळीपर्यंत प्रमाण वाढवा. लसणाचा वास आणि चव तीव्र असल्यामुळे, तुम्ही त्याचे लहान तुकडे करूनही खाऊ शकता, ज्यामुळे ते खाण्यास सोपे जाते. तुम्ही ते मधात बुडवून कोमट पाण्यासोबतही खाऊ शकता.

सर्दी आणि खोकल्याच्या समस्येत आले आणि लसूण यांचे मिश्रण आपल्यासाठी उपयुक्त ठरते. आले आणि लसूण यांचा उष्ण प्रभाव असतो, तो खाल्ल्याने शरीरात उष्णता निर्माण होते तसेच सर्दी आणि तापापासून खूप आराम मिळतो. आलं लसूण एकत्र खाल्ल्याने घसा खवखवणे कमी होण्यास मदत होते तसेच नाकातून पाणी येणे आणि सर्दी होणे यापासून आराम मिळतो.

बहुतेक हिंदुस्थानातील घरांमध्ये आलं आणि लसूण हे हमखास वापरले जातात. त्यात अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म आहेत. यामुळे कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. आलं लसूण आहारात असल्याने, रक्ताभिसरणही वेगाने वाढते. आलं लसूण एकत्र खाल्ल्यामुळे केवळ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. केवळ इतकेच नाही तर, हृदयाशी संबंधित आजारांचा धोकाही मोठ्या प्रमाणात कमी होतो. आले आणि लसूण एकत्र खाणे आपल्या हृदयासाठी सुद्धा फायदेशीर आहे. यामुळे वजन सहज कमी होते आणि कोलेस्टेरॉलची पातळी देखील कमी होते. यामुळे एथेरोस्क्लेरोसिसचा धोका कमी होतो. तसेच आपला रक्तदाब नियंत्रित राहतो, ज्यामुळे स्ट्रोक आणि हृदयविकाराचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी होतो.

आले आणि लसूण एकत्र खाल्ल्याने कर्करोगाशी लढण्यास मदत होते. या मिश्रणात अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आहेत, जे कर्करोगाच्या पेशींना नुकसान पोहोचवून कर्करोगाचा धोका कमी करण्यास मदत करतात.

आले आणि लसूणमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात; ते खाल्ल्याने हात आणि पाय दुखण्यापासून आराम मिळतो तसेच शरीरातील सूज दूर होते. आले आणि लसूणमध्ये आढळणारे गुणधर्म संधिवाताची लक्षणे कमी करण्यास देखील उपयुक्त ठरतात.

## संक्षिप्त

### ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील महाभियोग प्रस्ताव फेटाळला

**नवी दिल्ली, ता. ८ :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात दाखल केलेला महाभियोग प्रस्ताव फेटाळण्यात आला आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्वात विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांत महाभियोग नोटीस दिली होती. महाभियोग प्रस्ताव फेटाळल्यानं हा विरोधी पक्षांना मोठा झटका मानला जात आहे.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील महाभियोग प्रस्ताव राज्यसभेच्या सभापतींनी फेटाळून लावला आहे. विरोधी पक्षांच्या खासदारांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याची मागणी केली होती. मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवण्यासाठी तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्वात विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांत महाभियोग नोटीस दिली होती. मात्र, राज्यसभेच्या सभापतींनी ही नोटीस स्वीकारण्यास नकार दिला आहे. दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग प्रस्ताव दाखल करण्याची ही देशातील पहिलीच वेळ आहे.

### महिलांचं शोषण केल्याची खरातची कबुली

**नाशिक, ता. ८ :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याला ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सध्या अशोक खरातची एसआयटीकडून चौकशी सुरू असून यावेळी चौकशीत धक्कादायक समोर येतीय. चमत्कार आणि वशीकरण नव्हे तर हातचलाखीने महिलांना धमकवल्याची तसंच शोषण केल्याची अशोक खरातनं कबुल केल्याच सांगण्यात येतंय. ज्या गोष्टींना लोक चमत्कार आणि वशीकरण समजतात, ती हातचलाखी असल्याचं अशोक खरातने मान्य केल्याची सूत्रांची माहिती आहे. दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए, असं म्हणत भोंदू अशोक खरातने एसआयटीच्या चौकशीत केलेल्या काळ्या कारनाम्याची कबुली दिल्याची सूत्रांची माहिती आहे. महिलांना जाळ्यात ओढण्यासाठी वापरलेल्या ट्रिक्सला विज्ञानानाचे नाव दिल्याचं समोर आलं आहे.

# पीडितांचे व्हिडिओ हटवले ४६५० लिंक काढल्या; तेजस्वी सातपुतेंची माहिती

**नाशिक, ता. ८ :** महिला अत्याचार प्रकरणातील आरोपी भोंदूबाबा अशोक खरात याला १७ मार्चला अटक करण्यात आल्यानंतर त्याच्यावर आतापर्यंत १२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये महिला अत्याचाराचे ८ तर आर्थिक फसवणुकीचे ४ गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती आज एसआयटी चौकशी समितीच्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी दिली. तसेच या प्रकरणातील पीडितांबाबत गोपनीयता आणि त्यांच्या संरक्षणासाठी सोशल मीडियातून पीडितांचे व्हिडीओ हटवण्यात आले आहेत. यामध्ये ४६५० लिंकदेखील काढल्याची माहिती त्यांनी दिली.



महिला लैंगिक अत्याचारातील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाच्या चौकशीकरिता तीन आठवड्यांपूर्वी नेमण्यात आलेल्या एसआयटी चौकशी समितीच्या पहिल्याच पत्रकार परिषदेत तपास पथकाच्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी या प्रकरणातील कारवाईची माहिती दिली. अशोक खरातला पहिल्या गुह्यात १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

तर दुसऱ्या गुह्यात ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून पुन्हा न्यायालयात हजर केले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, खरात प्रकरणात २० मार्चपासून एसआयटीने तपास सुरू केला आहे. एकूण ११ गुन्हे एसआयटीकडे तपासाला आहेत. सदर विशेष तपास पथकामध्ये दोन पोलीस उपाधीक्षक, तीन सहाय्यक तपास अधिकारी, तीन सहाय्यक पोलीस निरीक्षक, १० पोलीस उपनिरीक्षक आणि ६ पोलीस अंमलदार असे एकूण २४ जणांचे पथक तपासासाठी कार्यरत आहे.

प्रकरणातील मुख्य आरोपीसह अन्य कोणत्याही अधिकाऱ्याने भोंदू खरातला गुह्यात सहाय्य केल्याचे पुराव्यानिशी निष्पन्न झाले, तर त्या अधिकारी, पदाधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही सातपुते यांनी स्पष्ट केले. संपूर्ण कारवाईची माहिती महत्त्वाच्या टप्प्यांवर दिली जाईल. मात्र आरोपपत्र दाखल होईपर्यंत गोपनीयता पाळावी लागेल, असे त्या म्हणाल्या.

**४५१ अकाऊंट बंद, सहा जणांना अटक**

खरात प्रकरणाचा तपास सुरू असताना गोपनीयतेचा भंग करून सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणारी ४५१ अकाऊंट कायम स्वरूपी बंद करण्यात आली आहेत. तसेच पीडिताचे आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित केल्याप्रकरणी आत्तापर्यंत सातपूर पोलीस ठाणे नाशिक शहर आणि कोपरगाव पोलीस ठाणे अहिल्यानगर या ठिकाणी दोन गुन्हे दाखल करून सहा जणांना अटक करण्यात आली आहे.

### एकनाथ शिंदे भाकरी फिरवण्याच्या तयारीत

**मुंबई, ता. ८ :** उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे भाकरी फिरवण्याच्या तयारीत असल्याचं पक्षाकडून सांगण्यात येतंय. जे काम करतील तेच पदावर राहतील, जे पदावर असून काम करत नाही त्यांना डच्चू देणार, असे स्पष्ट आदेश एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. त्यामुळेच मागील आठवड्यात पुण्यात शिवसेनेची पूर्ण कार्यकारिणीच बरखास्त केली गेली. यातून राज्यातील इतर पदाधिकाऱ्यांना थेट संदेश देण्यात आला आहे. आता निवडणुका तीन वर्ष तरी नाहीत. त्यामुळे राज्यातील सर्वच्या सर्व ४३ हजार गावांपर्यंत शिवसेना पोचण्यासाठी कामाला लागा असेही आदेश एकनाथ शिंदे यांचे आहेत. एकनाथ शिंदे यांचे सर्व लक्ष पक्ष संघटना वाढीकडे असल्याची सूत्रांची माहिती आहे. आता क्वांटिटी नको, क्वालिटी हवी, फक्त निधीसाठी येणारे दूर केले जातील, जे पक्षाचे काम करतील तेच पक्षात मोठ्या पदांवर जातील असेही संकेत एकनाथ शिंदेंनी दिल्याचं बोललं जातंय.

# भारताची अवस्था मोदींमुळे डरपोक उंदरासारखी झालीयं; संजय राऊतांची घणाघाती टीका

**मुंबई, ता. ८ :** अमेरिका इराण-इस्त्राइल संघर्षात मध्यस्थी करत शस्त्रसंधी घडवून आणल्याच्या पार्श्वभूमीवर खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. या प्रक्रियेमुळे पाकिस्तान पुन्हा जागतिक स्तरावर चर्चेत आला असून, भारतासाठी ही लाजिरवाणी बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार निशाणा साधत ते फक्त टेलिफोन ऑपरेटरसारखे काम करत आहेत असा टोला लगावला.

भारताची अवस्था मोदींमुळे डोरपोक उंदरासारखी झालीयं. इतक्या मोठ्या घडामोडी आशिया खंडात घडत असताना हिंदूस्तानच्या पंतप्रधानांनी काय करावं, टेलिफोन



ऑपपरेटरचं काम केलं. यामध्ये ते बिझी होते. सौदी अरेबिया, जॉर्डन, नेपाळ, दुबई, इराण यांच्याशी फोनवरुन बोलत असतात. पण युद्ध थांबवण्याचं श्रेय पाकिस्तानला मिळालं. अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीकेची झोड उठवली.

राऊत पुढे म्हणाले की, या युद्धात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. आखाती देशांमध्ये शेकडो लोकांचा मृत्यू झाला. मात्र, इराणने अमेरिका आणि इस्त्रायलसारख्या शक्तींना शरणागती पत्करली नाही आणि दीर्घकाळ संघर्ष करत आपली भूमिका ठाम ठेवली. देशासाठी लढण्याची आणि बलिदान देण्याची शिकवण इराणने दिली, असे ते म्हणाले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरही संजय राऊत यांनी टीका केली.


राऊत यांनी प्रश्न उपस्थित केला की, युद्धात मध्यस्थी करण्याचे श्रेय अमेरिका, चीन आणि पाकिस्तानला मिळत असताना भारत कुठे आहे? हे श्रेय नरेंद्र मोदी यांना मिळायला हवे होते. त्यांनी अमेरिका, इराण आणि इस्त्रायलच्या नेत्यांना एकत्र आणून शांततेचा संदेश द्यायला हवा होता, असे ते म्हणाले. मात्र, भारताची कोणतीही ठोस भूमिका नसल्याची टीका त्यांनी केली. तसेच देशांतर्गत राजकारणावर लक्ष केंद्रित करत असताना जागतिक घडामोडींमध्ये भारत मागे पडत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

पाकिस्तानला प्रतिष्ठा मिळण्यास मोदी सरकार जबाबदार राऊत म्हणाले की, इस्लामाबादमध्ये शांतता चर्चेची शक्यता व्यक्त केली जात आहे, जे भारतासाठी धक्कादायक आहे. ज्या इस्लामाबादवर ताबा मिळवण्याच्या घोषणा केल्या जात होत्या, त्याच ठिकाणी आता जागतिक नेते शांततेवर चर्चा करत आहेत, असे ते म्हणाले.

### जनभावनेचा आदर करा, उमेदवार मागे घ्या : देवेंद्र फडणवीस

**बारामती, ता. ८ :** जनभावनेचा आदर करा आणि उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या विरोधातील आपला उमेदवार मागे घेऊन बारामती विधानसभा मतदारसंघात निवडणूक बिनविरोध होईल याची खात्री करा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. या जागेसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून, ४ मे रोजी मतमोजणी होईल.

मेट्रो लाइन ९ कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन केल्यानंतर मीरा-भाईंदर येथे पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, या दुर्दैवी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बारामतीतील जनतेची अशी इच्छा आहे की, या निवडणुकीत सर्वसंमत उमेदवार असावा. जनभावना सुनेत्रा पवार यांच्या बाजूने आहे. मला अशी अपेक्षा आहे की, काँग्रेस पक्ष या जनभावनेचा




मान राखेल. जनतेची अशी इच्छा आहे की, सुनेत्रा पवार या बिनविरोध निवडून याव्यात. जर काँग्रेसने निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली, तर त्याचा अर्थ अजित पवार यांच्या स्मृतीचा आदर करणे असा होईल.

दरम्यान, काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी सुनेत्रा पवार यांच्या विरोधात आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेण्याची अंतिम तारीख ९ एप्रिल आहे.

# बारामतीच्या पोटनिवडणुकीसाठी ५३ अर्ज वैध

**बारामती, ता. ८ :** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी ६ एप्रिल २०२६ रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी त्यांच्यासमेवत पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती होती. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाती निधनानंतर ही जागा रिक्त झाली असून त्यासाठी पोटनिवडणूक होत आहे.

दुसरीकडे काँग्रेसनेही या निवडणुकीसाठी रणशिंग फुंकले असून, आकाश मोरे यांना उमेदवारी देऊ केली आहे. त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल करत सुनेत्रा पवारांना थेट आव्हान दिले आहे. अर्ज भरण्यापूर्वी बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, प्रत्यक्षात चित्र वेगळे झाले आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत



सुनेत्रा पवारांविरोधात तब्बल ५३ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. ७ एप्रिल २०२६ रोजी उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पार पडली. एकूण ५५ उमेदवारांनी ६८ अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ५३ अर्ज वैध ठरले, तर १५ अर्ज बाद करण्यात आले. यामध्ये १३ अर्ज दुहेरी असल्यामुळे रद्द करण्यात आले, तर २ अर्ज तांत्रिक त्रुटींमुळे बाद झाले. या प्रक्रियेनंतर निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट झाले असून, अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर अंतिम लढत किती उमेदवारांमध्ये होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, या निवडणुकीत एक नाव विशेष चर्चेत आले आहे. करुणा मुंडे यांनी अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरत बारामतीतील विविध प्रश्नांवर आवाज उठवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यामुळे बारामतीची निवडणूक रंगतदार होणार आहे.

अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष अजित पवारांच्या निधनानंतर ही निवडणूक बिनविरोध होईल, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र, काँग्रेसने उमेदवार उभा करत ही शक्यता फेटाळली आहे. सुनेत्रा पवार यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी फोनद्वारे संवाद साधत पाठिंबा देण्याची विनंती केली होती. तरीही काँग्रेसने आकाश मोरे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे आता बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध काँग्रेस असा थेट सामना रंगणार आहे. या निवडणुकीकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलले आहे.

# यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस मान्सूनवर एल निनोचे सावट

**पुणे, ता. ८ :** यावर्षी मान्सूनवर एल निनोचा परिणाम होणार असल्याने २०२६ या वर्षात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडणार आहे,असा अंदाज स्कायमेट ह्या खासगी हवामान संस्थेने वर्तवला आहे. जून ते सप्टेंबर ह्या ४ महिन्यांच्या कालावधीत मान्सूनचे पर्जन्यमान सरासरीच्या ९४ टक्के असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला. तसेच, हंगामाच्या दुसऱ्या सहामाहीत एल निनोची तीव्रता वाढण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.

जून महिन्यात मान्सून तुलनेने स्थिर राहण्याची शक्यता असली, तरी जुलै ते सप्टेंबर या कालावधीत पावसाची तीव्रता कमी होण्याचा अंदाज आहे. देशातील मध्य आणि उत्तर-पश्चिम भागांत पावसाची कमतरता जाणवू शकते. यामुळे शेती आणि जलस्रोतांवर परिणाम होण्याची



भीती आहे. तसेच, भारतीय हवामान विभागाकडून पुढील आठवड्यात मान्सून हंगामासाठीचा आपला पहिला अंदाज जाहीर करण्याची शक्यता आहे. देशातील एकूण वार्षिक पावसाच्या सुमारे ७० टक्के पाऊस हा जून ते सप्टेंबर दरम्यान पडणाऱ्या दक्षिण-पश्चिम मान्सूनमुळे मिळतो.

देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा असलेल्या कृषी क्षेत्रासाठी हा पाऊस अत्यंत महत्त्वाचा आहे. देशातील १४० कोटींहून अधिक लोकसंख्येपैकी अर्ध्याहून अधिक लोक शेतीवर अवलंबून आहेत. खरीप हंगामातील बहुतांश पेरण्या जून आणि जुलै महिन्यात होत असल्याने मान्सूनचे वेळेवर आगमन आणि वितरण हे महत्वाचे ठरते.



# पृथ्वीराज कपूर हायस्कूलचा हिंदी परीक्षेत १०० टक्के निकाल

**लोणी काळभोर, ता. ०८ :** अखिल भारतीय राष्ट्रभाषा विकास समिती अंतर्गत घेण्यात आलेल्या हिंदी बाह्य परीक्षेत लोणी काळभोर (ता. हवेली) येथील पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूलने नेत्रदीपक यश संपादन करत तब्बल १०० टक्के निकालाची अभिमानास्पद नोंद केली आहे. एकूण ८६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि विशेष म्हणजे सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण होत विद्यालयाची यशपरंपरा अधिक भक्कम केली आहे.

या निकालातील ठळक बाब म्हणजे ८२ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवत उत्कृष्ट कामगिरी बजावली, तर उर्वरित ४ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी मिळवली. गुणवत्तेच्या बाबतीतही शाळेने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. यामध्ये राष्ट्रीय भूषण पुरस्कार विजेते म्हणून कार्तिक शंकर राऊत (इयत्ता ८ वी), सुमित नवनाथ मोरे (इयत्ता १० वी) आणि जयेश दत्तात्रय गोडगे (इयत्ता ६ वी) यांनी विशेष कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या यशामुळे शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची साक्ष पुन्हा एकदा मिळाली आहे.

दरम्यान, या भव्य यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य सिताराम गवळी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन करत त्यांच्या कठोर परिश्रमांचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या ज्येष्ठ शिक्षिका मधुबाला काळभोर यांच्या मोलाच्या योगदानाचाही विशेष सन्मान करण्यात आला. या यशामुळे लोणी काळभोर परिसरात शाळेचा नावलौकिक अधिक उंचावला असून, मेहनत, शिस्त आणि योग्य मार्गदर्शन असेल तर यश निश्चित मिळते याचा पुन्हा प्रत्यय आला आहे.

# उन्हाळाच्या सुट्ट्यांमध्ये एसटीचा प्रवास महागणार; १५ तारखेपासून भाडेवाढ लागू

**पुणे, ता. ८ :** यंदाच्या उन्हाळी सुट्ट्यांमध्ये जर तुम्ही एसटीने जाण्याचा विचार करत असाल तर, तुम्हाला आता अधिकचे पैसे मोजावे लागणार आहे. राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने सुट्टीचा हंगाम लक्षात घेता १५ एप्रिलपासून १० टक्के हंगामी भाडेवाढीसह प्रति तिकिटामागे दोन रुपये असा स्वच्छता अधिभार घेण्याचा निर्णय घेतला आहे.

उन्हाळी भाडेवाढ ही केवळ दोन महिन्यांसाठी असून स्वच्छता अधिभार हा कायम स्वरूपी असणार आहे. एसटी महामंडळाकडे सफाई कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्यामुळे एसटी



गाड्यांसह, स्थानके आणि आगार स्वच्छतेसाठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येणार आहे.

ही दरवाढ विशेषत: साधी बस म्हणजे लाल परी, मिडी बस, जलद देवा आणि रात्रसेवा देणाऱ्या गाड्यांसाठी लागू असेल. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आता प्रौढ प्रवाशांसाठी बसेसच भाडे प्रति टप्पा हा १२ रुपये असेल आणि लहान मुलांसाठी हे भाडे ७ रुपये ठरवण्यात आले आहे. १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीसाठी एसटीची भाडेवाढ लागू होणार आहे. भाडेवाढ केवळ साध्या बसगाड्यांसाठी असेल. भाडेवाढीतून हिरकणी, शयनयान, शिवशाही, जनशिवनेरी, शिवनेरी या गाड्यांसह ई-बस गाड्यांना वगळण्यात आले आहे.

तसेच महिला सन्मान योजना, ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक आणि अन्य सवलतधारी प्रवाशांना हा अधिभार लागू असणार नाही. आवडेल तेथे प्रवास योजनेंतर्गत चार आणि सात दिवसांचा पास देण्यात येतो. अशा प्रवाशांसाठी पाच रुपये अधिभार असणार आहे. पास देताना प्रवाशांकडून ही रक्कम वसूल करण्यात येणार आहे. दरम्यान, आगाऊ आरक्षणातून काढलेल्या पासवर स्वच्छता अधिभार असणार नाही. एसटीच्या बसगाड्या भाडेतत्त्वाने घेणाऱ्यांना प्रति बस ५० रुपये इतका अधिभार द्यावा लागणार आहे, असे एसटी महामंडळाने स्पष्ट केले आहे. या भाडेवाढीमुळे एसटीचा लांब पल्याचा प्रवास ९० ते १०० रुपयांनी महागणार आहे. गर्दीच्या हंगामात भाडेवाढ करण्याची एसटी महामंडळाला परवानगी आहे. त्यानुसार गर्दीच्या हंगामात तात्पुरत्या स्वरूपाची भाडेवाढ केली जाते. गेल्यावर्षी दिवाळीमध्ये एसटी महामंडळाने जाहीर केलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ नागरिकांच्या रोषामुळे रद्द केली होती.